// राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ //

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

"सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"
नॅकद्वारा पुनर्मूल्यांकित 'अ' श्रेणी प्राप्त

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

Website: www.nagpuruniversity.org, E-mail : infoarcollege@ymail.com | दूरध्वनी: (०७१२)२५२९९३२

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, सिव्हील लाईन, नागपूर – ४४० ००१.

क्रमांक : रातुमनावि/मविवि/१८/पदव्यु. प्रवेश/ ११५० — दिनांक : २७ जून २०१८

## :: परिपत्रक ::

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येत आहे की, सत्र २०१८–१९ या शैक्षणिक सत्रासाठी प्रथम टप्यातील खालील सहा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ स्तरावरील केन्द्रीय प्रवेश पद्धतीने प्रवेश प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

1. Master of Commerce (M.Com.)
2. Master of Commerce Professional (M.Com. Professional)
3. Master of Science (M.Sc. Forensic Science.)
4. Master of Cosmetic Technology (M.C.T.)
5. Master of Hospitality Management (M.HOSP.)

वरील अभ्यासक्रमाकरिता सत्र २०१८–१९ या शैक्षणिक वर्षाला प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व संबंधीत महाविद्यालयांच्या Login ID मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ज्या विद्यार्थ्यांना वरील अभ्यासक्रमाकरिता प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आले आहेत अशा पात्र विद्यार्थ्यांचे "**प्रवेशपत्र**" संबंधीत विद्यार्थ्यांच्या Login ID मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. संबंधीत विद्यार्थ्यांनी या प्रवेश पत्राची प्रत प्रींट करून प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयांमध्ये आपल्या सर्व मूळ प्रमाणपत्रांसह आवश्यक ते प्रवेश आणि शैक्षणिक शुल्क भरून दिनांक २ जुलै २०१८ पर्यंत प्रवेश निश्चित करावेत.

संबंधीत महाविद्यालयांनी प्रवेश निश्चित केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती आपल्या महाविद्यालयीन Login ID मध्ये भरून दिनांक २ जुलै २०१८ पर्यंत प्रथम फेरीतील प्रवेश निश्चित करावेत. प्रवेश निश्चित झाल्यानंतर महाविद्यालयांनी Login ID मध्ये संबंधीत प्रवेश अपलोड न केल्यास हे प्रवेश निश्चित समजण्यात येणार नाही. तथापि, सदर रिक्त राहिलेल्या प्रवेशीत जागा ह्या दुसऱ्या प्रवेश प्रक्रीयेसाठी रिक्त समजल्या जातील याची सर्व संबंधीत महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

आदेशान्वये

(डॉ.रमण मदने)
नोडल अधिकारी
तथा सहायक कुलसचिव